# अण्णाचा ब्लॉग बंद

मुंबई, (प्रतिनिधी) : ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी आज कोअर कमेटीत आपण कोणताही बदल करणार नसल्याचे स्पष्ट करताना आपल्या ब्लॉगचा गैरवापर होत असल्याने तो बंद करण्यात येणार असल्याचे जाहीर केले. आपल्या ब्लॉगरने आपला विश्वासघात केला, तोच घरचा भेदी निघाला, असे आरोप करताना हा आपल्या बदनामीचा कट असल्याचा संशयही अण्णांनी व्यक्त केला. मात्र अण्णांच्या वतीने त्यांचा ब्लॉग चालवणाऱ्या ज्येष्ठ पत्रकार राजू परुळेकर यांनी कोअर कमेटीत बदल करण्याबाबतचे अण्णांचे पत्र या ब्लॉगवर टाकून अण्णांनाच तोंडघशी पाडले आहे.

जनलोकपाल विधेयक आंदोलनाला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादानंतर देश-विदेशांतील समर्थक चाहत्यांशी संवाद साधण्यासाठी अण्णांनी आपला ब्लॉग सुरू केला होता. ज्येष्ठ पत्रकार राजू परुळेकर व माहिती आयुक्त विजय कुवळेकर यांच्यावर हा ब्लॉग चालवण्याची जबाबदारी अण्णांनी सोपवली होती. मध्यंतरी १५ दिवस अण्णांनी मौनव्रत धारण केले तेव्हा या ब्लॉगद्वारेच अण्णांचा जगाशी संवाद सुरू होता.

अण्णा कागदावर आपले म्हणणे लिहून देत व कुवळेकर-परुळेकर ते ब्लॉगद्वारे जगापर्यंत पोहोचवत होते. पण जनलोकपाल आंदोलनाच्या कोअर टीम मध्ये अण्णा फेरबदल करणार असल्याचे ब्लॉगवरून प्रसिद्ध झाले व गोंधळ उडाला. अण्णांनी आज दिल्लीत पत्रकारांशी बोलताना परुळेकरांनी त्यांची मतं आपल्या नावावर खपवल्याचा आरोप करून त्यांना विरोधकांचा हस्तक तर ठरवलेच, पण हा ब्लॉग बंद करणार असल्याचेही जाहीर केले. माझी प्रतिमा मलिन करण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करण्यात येत आहेत. ब्लॉगवरचे पत्र हा त्याचाच भाग असावा, असा संशय त्यांनी या वेळी व्यक्त केला.

कोअर कमेटीत बदल करण्याचा आपला विचार होता. त्याबाबतची काही मते मी माझ्या टिपणवहीत नोंदवली होती. पण तो काही माझा निर्णय नव्हता. त्यामुळे जो माझा निर्णय नव्हता तो ब्लॉगवर येऊच शकत नाही, असे सांगत आपण हा ब्लॉगच बंद करणार असल्याचे अण्णांनी सांगितले.